# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 06.11.2024** **वार – बुधवार**

---

**दिवाळीत 1400 टन कचरा**

दिवाळीनिमित्त नागरिक घरांची साफसफाई करतात. तसंच बाजारात होणारी गर्दी आणि फटाक्यांच्या आतषबाजीमुळे, शहराच्या प्रत्येक भागात आणि मुख्य बाजारपेठात मोठ्या प्रमाणावर कचरा निर्माण होतो.

पिंपरी-चिंचवड शहरात दिवाळीचे चारही दिवस सरासरी 1400 टन कचरा महापालिकेकडून उचलण्यात आला. यंदा दिवाळीत दिवसाला दोनशे टन कचऱ्याची भर पडल्याचे पिंपरी-चिंचवड महापालिकेचे आरोग्य कार्यकारी अधिकारी गणेश देशपांडे यांनी सांगितलं .

**वेदभवन**

पुण्यातील वेदाचार्य घैसास गुरुजी वेदपाठशाळा, वेदभवन इथं आज पासून वर्धापनदिन महोत्सवाच्या विविध धार्मिक कार्यक्रमांना प्रारंभ झाला. यावर्षीच्या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्ववेद या सर्वांची मिळून 75 पारायणे होणार आहेत.

**निवडणुक**

विधानसभा निवडणुकीत महिलांची मते निर्णायक ठरणार असल्याचं भाजप नेते प्रवीण दरेकर यांनी म्हटलं आहे. ते आज पुण्यात पत्रकार परिषदेत बोलत होते. महायुती सरकार अडीच वर्षातील विकासाची शिदोरी घेऊन मतदारांच्या समोर जाताना, राज्यातील जनतेला विश्वास देण्याचं काम करत असल्याचे त्यांनी सांगितलं. पुण्यात, मेट्रोचं जाळ पसरत असून तीन विस्तारित मार्गांना मंजुरी देण्यात आली आहे. तसंच रिंग रोड माध्यमातून वाहतूक कोंडी सोडवली जात असल्याचं दरेकर म्हणाले .

दरम्यान भाजप आणि महायुतीच्या उमेदवारांविरोधात बंडखोरी केल्यानं भाजपनं राज्यभरातील आपल्या 40 पदाधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. पक्षशिस्त आणि अनुशासन भंग केल्यानं पक्षातून निष्कासनाची कारवाई करण्यात येत असल्याचं भाजपनं आपल्या प्रसिद्धी पत्रकात म्हटलं आहे.

**प्रचारयात्रा**

दिवाळी नंतर शहर परिसरात कालपासून विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराला वेग आला आहे. महाविकास आघाडीचे उमेदवार रवींद्र धंगेकर त्यांच्या प्रचारयात्रेला आज मंडई गणपतीपासून प्रारंभ झाला. कसबा मतदारसंघाचा विकास निधी अन्यत्र वळविण्याचा प्रयत्न करणाऱ्या सत्ताधाऱ्यांना मतदार धडा शिकवतील, असा विश्वास महाविकास आघाडीचे धंगेकर यांनी व्यक्त केला आहे . तर पुणे शहरातील मध्य वस्तीतील अरुंद रस्त्यांवर दहा रुपयांत दिवसभर प्रवासाची सुविधा देणारी पुण्यदशम् बससेवा पुणेकरांच्या पसंतीला उतरली असून, तीन वर्षांत एक कोटीहून अधिक नागरिकांनी प्रवास केला असल्याचा दावा भाजप महायुतीचे कसबा मतदारसंघातील उमेदवार हेमंत रासने यांनी केला. शनिवार आणि नारायण पेठेत  रासने यांच्या प्रचारार्थ आयोजित पदयात्रेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. पर्वती विधानसभा मतदारसंघातील आमदार माधुरी मिसाळ विधिमंडळातील आपल्या जुन्या सहकारी असून विविध विकासकामांचा प्रशासनाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याची त्यांची हातोटी वाखाणण्याजोगी आहे. त्यामुळेच माधुरीताई चौथ्यांदा विक्रमी मताधिक्याने पर्वती मतदारसंघातून विजयी होतील, असा विश्वास भाजपच्या राष्ट्रीय चिटणीस आमदार पंकजा मुंडे यांनी व्यक्त केला आहे . मिसाळ यांच्या प्रचारार्थ काल मंगळवारी जनता वसाहत इथे मुंडे यांच्या प्रमुख उपस्थितीत पदयात्रेचे आयोजन करण्यात आलं होतं, त्यावेळी त्या बोलत होत्या. तर अपक्ष उमेदवार आबा बागूल यांनी आज नागरिकांची घरोघरी जाऊन भेटीगाठी घेतल्या. सकाळी बागूल यांनी फूल आणि तरकारी बाजाराला भेट दिली. वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी प्रयत्न करण्यासह बाजारात आलेल्या शेतकऱ्यांसाठी विश्रांती कक्ष, खरेदीसाठी आलेल्या ग्राहकांसाठी लगेज काउंटर आदी सुविधा उपलब्ध करून देण्याची ग्वाहीही त्यांनी दिली. दरम्यान पथविक्रेता संघाने सिद्धार्थ शिरोळे यांना विधानसभा निवडणुकीसाठी पाठिंबा जाहीर केला आहे, छत्रपती शिवाजीनगर एकता समितीचे अध्यक्ष दीपक मोहिते यांनी आज शिरोळे यांच्या कार्यालयात, त्यांची भेट घेऊन  हा  पाठींबा जाहीर केला.

**वंदे मातरम्'**

भारतीय स्वातंत्र्य लढ्याचा युद्धघोष असणाऱ्या 'वंदे मातरम्' या काव्याच्या निर्मितीचे 150 वे वर्ष 7 नोव्हेंबर पासून सुरू असून भारतीय इतिहास संकलक समितीच्या माध्यमातून वंदे मातरम् सार्ध शती समारोह समितीतर्फे राष्ट्रीय पातळीवर विविध उपक्रम राबविले जाणार आहेत. या उपक्रमांचा शुभारंभ येत्या शुक्रवारी पुण्यात वंदे मातरम् एकशे 50 या अभिवाचनात्मक दृकश्राव्य कार्यक्रमाद्वारे होणार आहे.कार्यकारी समितीचे उपाध्यक्ष आणि वंदे मातरम्चे अभ्यासक मिलिंद सबनीस यांनी आज पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

**फुटबॉल**

धुळे येथे खेळल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य आंतरजिल्हा फुटबॉल स्पर्धेत पुणे जिल्हा संघाचे नेतृत्व बचावपटू श्रीतेज पवारकडे सोपविण्यात आले आहे. स्पर्धेच्या बाद फेऱ्यांना उद्यापासून सुरुवात होणार असून त्या 20 नोव्हेंबर पर्यंत चालतील.

**सायकलिंग**

उत्तराखंड इथे येत्या जानेवारी, फेब्रुवारीत होत असलेल्या 38 व्या राष्ट्रीय क्रीडा स्पर्धेसाठी, पुण्याच्या प्रताप जाधव यांची रोड सायकलिंगसाठी स्पर्धा संचालक म्हणून नेमणूक झाली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 32 तर किमान तापमान 17 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्या आकाश मुख्यत: निरभ्र राहून उद्या धूक पडण्याची शक्यता वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**